नि. फौ. खटला क्र. <u>२०४/२०२१</u>
सरकार विरूद्ध गोविंदराम व इतर
**निशाणी २६**

<u>**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी**</u>

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,
माझे नाव : हेमा दिलीप जेसवाणी
वय : ४० वर्षे,
धंदा : घरकाम,
राहणार : अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

मी सर्व आरोपींना ओळखते. आरोपी क्र. १ मयत झाला असुन आरोपी क्र. २ ते ४ न्यायालयासमक्ष हजर आहेत. फिर्यादी माझा पती आहे. चार वर्षांपुर्वी आरोपींसोबत आमची बोलाचाल झाली होती. आम्हाला अश्लिल शिवीगाळ झाल्याची कोणतीही घटना घडली नाही. पोलीसांनी मला विचारपुस करून माझे बयान नोंदवले नाही.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

२. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला विचारपुस करून माझे बयान नोंदवले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०८/०७/२०२१ रोजी दुपारी ३—४ वाजेदरम्यान आरोपींनी पावसाच्या पाण्याच्या कारणावरून माझे पतीला व आम्हाला हरामखोर, मादरचोद, भोसडीके अशी अश्लील शिवीगाळ केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझा मुलगा नविन यास त्याची गच्ची धरून त्याला थापडा—बुक्क्यांनी मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही

की, आरोपी क्र. ३ हा फावडा घेउन माझे पतीच्या अंगावर धाउन आला व सदर वेळी माझी सासु व मी माझे पतीला वाचवण्याचा प्रयत्न केला असता सदर आरोपींनी आम्हाला देखील लोटलाट केली व अश्लील शिवीगाळ केली. साक्षीदार स्वत:हुन सांगत की, माझी सासु द्रौपतीबाई मयत झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझे पतीला 'घर के बाहर निकल आज तुझे खल्लास कर देंगे अशी धमकी दिली होती. आता मला माझे बयानातील अधारेखांकित भाग अ वाचुन दाखवण्यात आला. सदर मजकुर मी पोलीसांना सांगितला नव्हता. सदर मजकुर माझे बयानामध्ये नमुद असल्याचे कारण मला सांगता येणार नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींसोबत आमची न्यायालयाबाहेर आपसांत तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्यामुळे त्यांना वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — सर्व आरोपींतर्फे अॅड. श्री. वाजिद अली यांचे मार्फत नाकारण्यात आली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १४.०५.२०२६ (ए.ए. माळी)
अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.